**ला.प्र.वि.नाशिक विभाग नाशिक** **<u>प्रेसनोट</u>** **दि.०९/०६/२०२६**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंक विभाग/ घटक | नाशिक / नाशिक. |
| फिर्यादी | सरकार तर्फे श्रीमती. स्वाती पवार, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक. |
| पोलीस ठाणे व गुरनं. | सटाणा पोलीस ठाणे नाशिक ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम- १९८८ चे कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे. |
| अधि. व कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम- १९८८ चे कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे. |
| आरोपी लोकसेवक नाव व कार्यालय | **आरोपी लोकसेवक श्रीमती. मनिषा नारायण बाविस्कर, वय- ३६ वर्ष, व्यवसाय- ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), ब्राम्हणगाव ता.सटाणा जि.नाशिक (वर्ग-३)**, राहणार- घर मालक श्री. शरद वामन कापुरे यांचे बंगल्यात भाडेतत्वावर, वरचा मजला, साठ फुटी रोड, पाठक मैदाण, सटाणा ता.सटाणा जि.नाशिक. आलोसे यांना योग्य जाप्त्यानिशी ताब्यात घेण्यात आलेले आहे. |
| मागणी रक्कम | १०,०००/- ( दहा हजार रूपये ) |
| स्विकारलेली रक्कम | १०,०००/- ( दहा हजार रूपये रोख त्यात ५०० रूपये दराच्या २० चलनी नोटा ) |
| हस्तगत रक्कम | १०,०००/- ( दहा हजार रूपये रोख त्यात ५०० रूपये दराच्या २० चलनी नोटा ) |
| थोडक्यात हकीगत | यातील मुळ तक्रारदार यांनी त्यांचे मौजे ब्राह्मणगाव येथे शेत गट क्र.८२४ मधील क्षेत्रावरील भाऊसाहेब हिरे विविध काक्य.सह.वि.सेवा संस्था सोसायटी ब्राम्हणगाव ता.सटाणा जि.नाशिक यांचा ४,००,०००/- रूपयाचा चढविलेला बोझा कर्ज माफ करण्यात आले होते परंतु सदर बोझा ७/१२ उताऱ्यावरचा कमी झाला नव्हता. तसेच सदर शेत गट क्र.८२४ वर वारस नोंदीच्या वेळेस त्यांचे नाव वेगळे नमूद केले होते परंतु त्यांचे कागदोपत्री नावाप्रमाणे बदलून मिळणेकरीता मुळ तक्रारदार यांनी दि.२६/०३/२०१५ व दि.१५/०४/२०२६ रोजी अर्ज दिला होता. या दोन्ही कामांकरीता आलोसे मनिषा नारायण बाविस्कर, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) यांनी स्वत: करीता व मंडळ अधिकारी यांचे करीता १०,०००/- रूपयाची मागणी दि. १६/०४/२०२६ रोजी केली अशी तक्रार मुळ तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नाशिक येथे केली होती.<br>त्याप्रमाणे दि. २७/०४/२०२६ रोजी तक्रारदार व पंच यांनी आलोसे यांची जिजामाता मराठा हायस्कूल सटाणा येथे जनगणना प्रशिक्षणा दरम्यान तसेच प्रशिक्षणानंतर सटाणा तहसिलदार कार्यालय ता.सटाणा जि.नाशिक येथे भेट घेतली त्यावेळी आलोसे यांनी वर नमूद कामे करण्याकरीता मुळ तक्रादार यांचेकडे १०,०००/- रूपयाची लाचेची मागणी केली व ती स्विकारण्याचे मान्य केले.<br>तसेच दि.२८/०४/२०२६ रोजी मुळ तक्रारदार व आलोसे मनिषा नारायण बाविस्कर, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), तसेच लोकसेवक मंडळ अधिकारी यांची पडताळणी करणेकामी सटाणा तहसिलदार कार्यालय ता.सटाणा जि.नाशिक येथे पाठविले असता मुळ तक्रारदार यांची वरील कामासंदर्भाने चर्चा झाली परंतु लोकसेवक मंडळ अधिकारी यांनी मुळ तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली नाही.<br>त्यानंतर दि.०९/०६/२०२६ रोजी रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले असता मुळ तक्रारदार यांनी आलोसे यांची सटाणा तहसिलदार कार्यालय ता.सटाणा जि.नाशिक भेट घेतली असता आलोसे यांनी सदर लाचेची रक्कम रोख १०,०००/- रूपये पंचांसमक्ष स्विकारल्याने आलोसे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे म्हणुन गुन्हा. |
| सापळा कारवाई | सापळा अधिकारी :- श्रीमती. स्वाती पवार , पोलीस उप अधीक्षक , ला.प्र.वि. नाशिक, मो.नं. ७७६८००४९९९.<br>कारवाई पथक :- १) पो.हवा./ शरद हेंबाडे, २) पो.हवा./ युवराज खांडवी, ३) चा.पो.हवा./ विनोद पवार, सर्व नेमणुक- ला.प्र.वि.नाशिक. |
| तपास अधिकारी | श्रीमती. रूपाली खांडवी, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. नाशिक, मोबा. ८३७९९६१०२०. |
| मार्गदर्शन | **मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.,नाशिक परिक्षेत्र,नाशिक.**<br>मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>मा.श्री. सुनील दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

Scanned with CamScanner

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंध काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेशी संपर्क करावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नाशिक, तिबेटीयन भाजीपाला मार्केट, HDFC बँक जवळ, शरणपुर रोड नाशिक. |
| संकेतस्थळ | :- acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- acbmaharashtra.net |
| टोल फ्रि क्रमांक | :- १०६४ |
| दुरध्वानी क्रमांक | :- ०२४१ – २४२३६७७ |
| व्हॉट्सअप क्रमांक | :- ९९३०९९७७०० / ९५४५०३१०६४. |

Scanned with CamScanner